# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

(ISO 9001:2008 प्रमाणित)

पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५

(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६९(O) Fax-२३५६८२०

website : http://www.dteau.org email : roaurangabad@dtemaharashtra.gov.in


जाक्र/विकाऔ/शिक्षण/२०१८/ ३०९६

दिनांक :- 2 NOV 2018

प्रति,
प्राचार्य,
शासकीय/अनुदानीत व विना अनुदानीत व्यावसायीक अभ्यासक्रमांच्या संस्था
औरंगाबाद विभाग

**विषयः**- जेष्ठ साहित्यिक/गायक/संगितकार पु. ल. देशपांडे, ग. दि. माडगुळकर व सुधीर फडके यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमीत्त दि. ३०-०८-२०१८ रोजी मा. मंत्री सांस्कृतिक कार्य हयांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केलेल्या बैठकीच्या इतिवृत्तानुसार कार्यवाही करणेबाबत.

**संदर्भ** :-मा. संचालक तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा. मुंबई यांचे पत्र क्र.१६/संकीर्ण/२०१८/ शा.२३८३, दि.१०/१०/२०१८

जेष्ठ साहित्यिक/गायक/संगितकार पु. ल. देशपांडे, ग. दि. माडगुळकर व सुधीर फडके यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमीत्त दि. ३०-०८-२०१८ रोजी मा. मंत्री सांस्कृतिक कार्य यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीचे इतिवृत्त सोबत जोडले असून इतिवृत्तात दर्शविल्याप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत मा. संचालनालयाच्या उपरोक्त पत्रानुसार कळविण्यात आले आहे.

त्यानुसार इतिवृत्तामध्ये दिलेल्या निर्देशानुसार कार्यवाही करुन त्याचा अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा.

सोबतः-वरीलप्रमाणे

(महेश शिवणकर)
प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद

प्रतः- १) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय म. रा. मुंबई यांना माहितीस्तव सादर.
२) या कार्यालयाच्या प्रोग्रामर यांना वेबसाईटवर अपलोड करण्यास्तव.

ज्येष्ठ साहित्यिक / गायक / संगीतकार पु. ल. देशपांडे, ग. दि. माडगुळकर व सुधीर फडके
यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त कार्यक्रम आयोजन करण्यासाठी
मा.मंत्री, सांस्कृतिक कार्य यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ३० ऑगस्ट, २०१८ रोजी
सहयाद्री येथे दु.१.३० वाजता
आयोजित बैठकीचे इतिवृत्त

---

ज्येष्ठ संगीतकार व गायक सुधीर फडके विख्यात कवी, पटकथा, संवाद लेखक ग. दि. माडगुळकर व नाटककार, संगीत दिग्दर्शक, साहित्यिक पु. ल. देशपांडे यांच्या सन २०१८-१९ या जन्मशताब्दी वर्षानिमित्त मा. मंत्री, सांस्कृतिक कार्य यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ३० ऑगस्ट २०१८ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस खालीलप्रमाणे मान्यवर उपस्थित होते.

१. प्रधान सचिव, सांस्कृतिक कार्य विभाग
२. उप सचिव, सांस्कृतिक कार्य विभाग
३. अवर सचिव (सां.का.४), सांस्कृतिक कार्य विभाग
४. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर
५. संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय
६. कार्यासन अधिकारी (सां.का.४), सांस्कृतिक कार्य विभाग

पु. ल. देशपांडे, ग. दि. माडगुळकर व सुधीर फडके यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त आयोजित करावयाच्या कार्यक्रमाची रुपरेषा ठरविण्यासाठी चर्चा करण्यात आली. त्यानुसार मा. मंत्री, सांस्कृतिक कार्य यांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत.

१. पु. ल. देशपांडे यांच्या जन्मशताब्दी निमित्त दिनांक ८ नोव्हेंबर, २०१८ रोजी विलेपार्ले, मुंबई येथे "पुलोत्सव" कार्यक्रम करावा. त्याअंतर्गत पु.ल.देशपांडे यांच्याशी संबंधीत साहित्य, छायाचित्र, कॅरीकेचर, तैलचित्रे इ. चे प्रदर्शन आयोजित करण्यात यावे. सदर प्रदर्शनाचा खर्च जिल्हा नियोजन समिती, मुंबई उपनगर यांच्याकडून करण्यात येईल. त्याकरीता आवश्यकतेनुसार संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय यांचेमार्फत निविदा प्रक्रिया राबविण्यात येईल. तसेच ग. दि. माडगुळकर व सुधीर फडके या मान्यवरांच्या जन्मशताब्दीनिमित्त पुलोत्सवाच्या धर्तीवर अनुक्रमे पुणे व मुंबई शहर येथे प्रदर्शनाचे आयोजन करण्यात यावे. सदर प्रदर्शनाचा खर्च अनुक्रमे जिल्हा नियोजन समिती, पुणे व मुंबई शहर यांच्यामार्फत करण्याबाबत संबंधितांना कळविण्यात यावे. सदरची प्रदर्शने आवश्यकतेनुसार त्या त्या जिल्ह्यातील इतर ठिकाणीही भरविण्यात यावीत.
२. या जन्मशताब्दी वर्षानिमित्त राज्यातील सर्व जिल्हयांमध्ये वर्षभरात सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे. सदर कार्यक्रमांच्या आयोजनासाठी ५ ते ६ खाजगी

संस्थांची निवड करावी. सदर सांस्कृतिक कार्यक्रम ज्या जिल्हयात असतील, त्या जिल्हयातील साहित्यिक, संगीतकार, कलाकार इ. यांचा सांस्कृतिक कार्यक्रमासाठी सहभाग घ्यावा.

३. महाविद्यालयांमध्ये संगीत, साहित्य, गीत या प्रत्येक विषयाशी संबंधीत एका दिवसाच्या अंदाजे १०० कार्यशाळा वर्षभरात आयोजित करण्यात याव्यात. विविध महाविद्यालयातील काही व्यक्तींची निवड करून सदरच्या कार्यशाळा आयोजीत करण्याबाबत त्यांना मार्गदर्शन करण्याकरीता राज्यस्तरावर एक शिबीर आयोजीत करावे. याकरिता उच्च व तंत्रशिक्षण विभागास आवश्यक ते निर्देश देण्यात यावेत.

४. विविध वयोगटासाठी "Stand-up comedy" ची स्पर्धा आयोजित करण्याबाबत एखाद्या दूरचित्रवाहिनीशी संपर्क साधावा.

५. शालेय विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धा, गीत रामायण स्पर्धेचे आयोजन शालेय शिक्षण विभागामार्फत करावे.

६. पु. ल. देशपांडे, ग. दि. माडगुळकर व सुधीर फडके यांच्याशी निगडीत चित्रपटांचा महोत्सव राज्यातील विविध चित्रपटगृहात आयोजित करण्यात यावा.

७. मा. पंतप्रधान महोदयांना आमंत्रित करुन जन्मशताब्दीनिमित्त भव्य स्वरुपाच्या एका सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन माहे नोव्हेंबर, २०१८ मध्ये करण्यात यावे.

८. राज्यातील विविध साहित्यिक व सांस्कृतिक संस्थांच्या पुढाकाराने राज्यभर साहित्य प्रदर्शन भरवावे.

९. जन्मशताब्दी वर्षानिमित्त आयोजित होणा-या विविध कार्यक्रमाच्या आयोजनासाठी सर्व संबंधित विभागांचे सहकार्य घेण्यात यावे. तसेच आवश्यकतेनुसार संबंधित विभागाच्या अधिका-यांचा सहभाग घेण्यात यावा.

१०.पु. ल. देशपांडे, ग. दि. माडगुळकर व सुधीर फडके यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्याबाबत राज्यातील सर्व बँका/सार्वजनिक उपक्रम/राज्य व केंद्र शासकीय कार्यालये/स्थानिक स्वराज्य संस्था इत्यादींना आवाहन करण्यात यावे.

११.वर्षभर होणा-या कार्यक्रमांचा आढावा घेण्यासाठी महिन्यातून एकदा बैठक आयोजित करण्यात यावी.

१२.या तीन महान व्यक्तीमत्वांच्या सन्मानार्थ टपाल तिकीट काढण्यासाठी केंद्र शासनाकडे पत्रव्यवहार करण्यात यावा.

मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात येणा-या बैठकीत, वरील निर्देशांच्या अनुषंगाने, सादरीकरण करण्यात यावे असे निर्देश मा. मंत्री, सांस्कृतिक कार्य यांनी दिले व बैठक समाप्त झाली असे जाहिर केले.

*********